**मग्रारोहयो अंतर्गत शेततळयांची अनुदान पध्दतीने कामे हाती घेणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र.शेतत-२००९/प्र.क्र.२७१/रोहयो-५**
**मंत्रालय , मुंबई -४०००३२**
**दिनांक :- १ जानेवारी, २०१०**

**वाचा -** १) शासन निर्णय क्र.शेतत-२००९/प्र.क्र. २७१/रोहयो-५, दिनांक ३१/८/२००९

**प्रस्तावना -**

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहु शेतीची पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचन उपलब्धता वाढविण्यासाठी, मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थी योजनेच्या धर्तीवर (जवाहर विहिर व फलोत्पादन योजना धर्तीवर) अनुदान पध्दतीने शेततळी घेण्याची योजना विचाराधीन होती. संदर्भात नमुद केलेल्या शासन निर्णय दिनांक ३१/८/२००९ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली. सदर योजने अंतर्गत राज्यात प्रत्येक वर्षी प्रति तालुका २०० शेततळी यात्रमाणे संपुर्ण राज्यात (मुंबई शहर व उपनगर जिल्हा वगळून) प्रत्येक वर्षी ७०४०० शेततळ्यांचे उद्दिष्ट सन २००९-१० साठी शासनाने निश्चित केले आहे. सदर योजना याप्रमाणे पुढील पाच वर्ष राबविण्यात येणार आहे. सदर योजनेच्या अटी, शर्ती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर शासन निर्णयान्वये शासन आता या योजनेच्या अटी, शर्ती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करीत आहे.

**शासन निर्णय :-**

मग्रारोहयो अंतर्गत अनुदान पध्दतीने शेततळे घेण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.:-

**१.१ लाभार्थी पात्रता -**

(१) शेतक-याकडे त्याच्या नावावर कमीत कमी ०.६० हेक्टर जमीन उपलब्ध असावी. यात कमाल मर्यादा नाही.
(२) शेतात विहीर नसावी व यापूर्वी इतर योजनांच्या माध्यमातून विहिर किंवा इतर सिंचन सुविधा मंजूर केलेली नसावी.
(३) लाभार्थी शेतक-याची जमीन शेततळ्याकरिता तांत्रिकदृष्टया पात्र असणे आवश्यक राहील.
(४) मग्रारोहयोखाली कुटुंबाची नोंदणी व जॉबकार्ड असणे अनिवार्य आहे.

**१.२ लाभार्थी निवड -**

खालील प्राथमिकतेनुसार लाभार्थी निवड करावी :-

उपसचिव

(१) अनुसूचित जाती-जमाती शेतकरी.
(२) दारिद्रय रेषेखालील (BPL) शेतक-यांमधील सर्वात शेवटच्या शेतक-याची निवड प्रथम या पध्दतीने (अंत्योदय मोड)
(३) अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी.
(४) वरील प्रवर्गात पुरेसे शेतकरी उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील सर्व शेतकरी.

टीप :- १) वरील प्राथमिकतेनुसार प्राप्त अर्जाचे वर्गीकरण करून यादी तयार करावी.
२) प्रत्येक प्रवर्गातील कमीतकमी जमीन धारकास प्रथम प्राधान्य याप्रमाणे चढत्या क्रमाने लाभार्थ्यांची निवड करावी.
३) सर्व प्रवर्गात महिला अर्जदारास प्राधान्य राहील.

## १.३ शेततळयासाठी अनुज्ञेय आकारमान व अनुदान -

या कार्यक्रमांतर्गत खालील आकारमानापैकी एका प्रकारचे शेततळे घेण्यास मुभा राहील. प्रत्येक आकारमानासाठी अनुज्ञेय अनुदान खालीलप्रमाणे राहील. :-

| अ.क्र. | शेततळयाचे आकारमान (मीटरमध्ये) | अनुज्ञेय अनुदान (रुपये)* |
|---|---|---|
| १ | १५ x १५ x ३ | १६५१५ |
| २ | २० x १५ x ३ | २३२६० |
| ३ | २० x २० x ३ | ३२८१० |
| ४ | २५ x २० x ३ | ४२३६० |
| ५ | २५ x २५ x ३ | ५४७१५ |
| ६ | २५ x ३० x ३ | ६७०७५ |
| ७ | ३० x ३० x ३ | ८२२४० |

* यामध्ये बोर्ड लावण्याचा खर्च समावशिष्ट आहे.

शेततळयासाठी वरील आकारमान दर्शविण्यात आले असले तरी शासन निर्णय ग्रा.वि. व ज.सं.वि. क्र. राकृवि-२००८/प्र.क्र.१६६/जल-७ दिनांक १७ मार्च,२००८ मधील परिष्छेदानुसार क्षेत्रफळाची मर्यादा व त्यांचे मंजूर अनुदान अनुज्ञेय राहील.

## १.४ शेततळयासाठी उद्दिष्ट / लक्षांक-

मग्रारोहयोतंर्गत अनुदान पध्दतीने शेततळे घेण्याची योजना शासनाने संदर्भात नमुद केलेल्या दिनांक ३१.८.२००९ च्या शासन निर्णयानुसार घोषित केली आहे. या योजनेतंर्गत राज्यात प्रत्येक वर्षी प्रतितालुका २०० शेततळी याप्रमाणे संपूर्ण राज्यात ( मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून ) प्रत्येक वर्षी ७०,४०० शेततळयांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. पुढील पाच वषांत याप्रमाणे एकूण ३,५२,००० शेततळे हाती घेण्याचे उद्दिष्ट आहे. सन २००९-१० साठी प्रति तालुका २०० प्रमाणे संपूर्ण राज्यात या योजनेतंर्गत ७०,४०० शेततळयांचे उद्दिष्ट राहील.



उपसचिव

प्रत्येक तालुकयाला २०० या उद्दिष्टयाप्रमाणे गावनिहाय उद्दिष्टयांच्या वितरणाची जबाबदारी परिच्छेद ५ मधील नमुद जिल्हा समितीची राहील. शेततळयांतील पाणीसाठयांमुळे होण्या-या लाभाची परिमाणता दृश्य स्वरुपात येण्यासाठी शेततळी मंजूर करताना Cluster appoach राहील यांची दखता घ्यावी.

**१.५ <u>शेततळयांचे काम करण्यासाठी अनुसरावयाची पध्दत</u> -**

**(१)** शेततळी बांधण्याचा कार्यक्रम मग्रारोहयोशी अंतर्गत अनुदान पध्दतीवर राबविण्यात येणार असल्याने शेततळयाचे काम लाभार्थ्याने स्वत: मजूराद्वारे किंवा अन्य पर्यायी साधनांच्या साहाय्याने पूर्ण करावयाचे आहे.

**(२)** हे काम पर्यायी साधनाद्वारे पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याकरीता पर्यायी साधने उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील.

**(३)** या कार्यक्रमांतर्गत शेततळयांच्या कामासाठी हजेरीपट ठेवण्याची आवश्कता नाही, व त्याअनुंषगाने मजुरी वाटप , सोई सवलती, शेड उभारणे इ. बाबींची आवश्कता राहणार नाही.

**(४)** शेततळयांचे काम पुर्ण झाल्यावर लाभार्थ्यांने तालुका कृषि अधिका-यांना शेततळे पुर्ण झाल्याचे कळविणे बंधनकारक राहील. (प्रपत्र-७)

**(५)** शेततळयांसाठी अनुज्ञेय असलेले अनुदान वरील परि.१.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**(६)** शेततळयांचे काम पुर्ण झाल्याचे लाभार्थ्याने कळविल्यावर संबंधित क्षेत्रिय अधिका-यांनी शेततळयाचे मोजमाप घेतल्यावर व वरिष्ठ अधिका-यांच्या तपासणीनंतर (प्रपत्र-८) १५ दिवसाच्या आत संबंधित लाभार्थ्याच्या बँकखात्यावर देय रक्कम थेट जमा करण्यात येईल किंवा संबंधीत लाभार्थ्यांच्या नांवाने रेखांकित धनादेशाद्वारे (Crossed Cheque) देय रक्कम अदा करण्यात येईल.

**२. <u>शेततळे योजनेची अंमलबजावणी-</u>**

**(अ) <u>योजनेचा प्रसार व प्रसिध्दी</u> -**

मग्रारोहयो अंतर्गत शेततळयांच्या कार्यक्रमास क्षेत्रिय अधिका-यांनी सर्वदूर प्रसिध्दी द्यावी. कृषि विभागाच्या सर्व कार्यालयात तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयास नोटीस बोर्डवर प्रसिध्दी द्यावी. गावपातळीवर दवंडी द्यावी तसेच कृषि विभागाच्या यंत्रणेमार्फत वैयक्तीक व सामुहीक बैठका, मेळावे घ्यावेत.

याव्यतिरिक्त योजनेच्या प्रसारासाठी जाहीरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. सदर जाहीरात मोठया प्रमाणावर खप असलेल्या स्थानिक वर्तमानपत्रामधून देण्यात यावी. **(सोबत जाहिरातीचा नमुना प्रपत्र-१ मध्ये देण्यात आला आहे.)**

अशा विविध स्तरावरुन प्रचार करावा आणि इच्छुक लाभार्थीना ठराविक मुदतीत अर्ज करण्यासाठी आवाहन करावे. जाहिरात वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द करावी.

**(ब) <u>लाभार्थ्याकडून अर्ज मागविणे</u> -**

इच्छुक शेतक-यांचे विहीत नमुन्यात अर्ज तथा संमती या योजनेत भाग घेण्यासाठी अनिवार्य आहे. त्यासाठी त्यांचेकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात यावे. **(अर्जाचा नमुना प्रपत्र-२ मध्ये देण्यात आला आहे.)**



उपसचिव

(क) **प्रशिक्षण** -

प्रत्यक्ष शेततळ्यांचे काम सुरु करण्यापूर्वी व काम संपल्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांना शेततळ्याचे महत्व, उपयोग व त्याची निगा राखणे (मेंटेनन्स) याबाबतची माहिती होण्याकरिता प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच एक वर्षानंतर स्थळ पाहणी करुन संबंधीत लाभार्थ्यांना पुन्हा माहिती देण्यात यावी. **(प्रशिक्षणाची माहिती प्रपत्र-९ मध्ये देण्यात आली आहे.)**

(ड) **शेततळयांसाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड** -

मग्रारोहयोतंर्गत शेततळ्यांच्या कामासाठी शासन निर्णय नियोजन विभाग क्र. रोहयो-२००७/प्र.क्र.९५/रोहयो-१ दिनांक १६ जुलै,२००७ व शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.राकृवि-२००८/प्र.क्र.१६६/जल-७ दिनांक १७ मार्च,२००८ व क्र. जलसं-२००८/प्र.क्र.५६/जल-७ दिनांक ११ एप्रिल,२००८ मधील नमुद तांत्रिक व आर्थिक मापदंड लागू राहतील.

मात्र, विदर्भातील खारपाणपट्ट्यातील शेततळ्याच्या कामासाठी इनलेट/आऊटलेटच्या संरक्षणासाठी दगडी पिचिंगला पर्याय म्हणून जैविक पिचिंग तसेच प्लॅस्टिकचे अस्तरीकरण करण्यासाठी शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक रोहयो-२००७/प्र.क्र.९५/रो-१ दि.९ जुलै,२००९ अन्वये मंजूर केलेले दरपत्रक लागू राहील.

## ३. लाभार्थी निवड समिती

लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | : | सह अध्यक्ष |
| वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा | : | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे | : | सदस्य |
| जिल्हा सामाजिक न्याय अधिकारी | : | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | : | सदस्य |
| जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | : | सदस्य सचिव. |

## ४. समितीची कार्यकक्ष-

**(अ)** संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन (प्रपत्र-३ प्रमाणे छाननी) त्यांची यादी तयार करुन परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा निवड समिती पुढे सादर करावा. **(प्रपत्र-४ गोषवारा)**

**(ब)** शासनाने विहित केलेल्या उपरोक्त परिच्छेद १.१ व १.२ मधील निकषांच्या आधारे निवड समितीने लाभार्थ्यांची निवड करावी. या निकषात अपवादात्मक परिस्थितीत बदल करावयाचे अधिकार समितीला राहतील. मात्र या बदलासाठी योग्य समर्थन करणे बंधनकारक राहील. **(पात्र लाभार्थ्यांचा गोषवारा प्रपत्र- ५ )**

उपसचिव

**(क)** निवड समितीने मान्यता दिल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांस त्यांची निवड झाल्याचे कळविण्यात यावे, व त्यास कार्यारंभ आदेश दयावा **(प्रपत्र-६)**

**(ड)** पात्र, अपात्र व प्रतिक्षा यादी नोटीस बोर्डवर लावावी. अपात्र व प्रतिक्षा यादी वरील लाभार्थ्यांना त्याप्रमाणे कळविण्यात यावे. **( प्रपत्र ६ अ) (प्रपत्र ६ ब)**

**(इ)** पात्र लाभार्थ्यांस कार्यारंभ आदेश दिल्यावर त्यास शेततळयाच्या आकारमानात बदल करावयाचा असल्यास त्यास पुन्हा निवड समितीची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

**ई)** लाभार्थ्यांची निवड झाल्यावर त्यास लाभ नको असेल किंवा अन्य कारणाणे त्यांचे नाव वगळावे लागल्यास अशा शिल्लक लक्षांकाकरिता बैठक घेऊन यादीप्रमाणे पुढील लाभार्थी निवडावा.

**फ)** मंजुरी / कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांने २ महिन्यात काम सुरु केले नाही, तर सदर, आदेश रद्द करुन प्रतिक्षा सुचीतील पुढील लाभार्थ्यांस कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

## ५. योजनेच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक -

१) जाहीरात प्रसिध्द करणे- (शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर १० दिवसात)

२) अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख - (जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवस)

३) प्राप्त अर्जाची छाननी/तपासणीचा कालावधी व पात्र अर्जदाराची यादी तयार करणे - (१० दिवस)

४) पात्र अर्जदाराची यादी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीकडे सादर करणे - (७ दिवस)

५) निवड समितीकडून लाभार्थी निवडल्यावर लाभार्थ्यास शेततळयाच्या मंजुरी पत्र पाठविणे . (७ दिवस)

## ६. तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता

अ) शेततळयांचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी तालुका कृषि अधिकारी यांनी दयावी.

ब) निवड समितीने लाभार्थी निवडल्यावर जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दयावी व कार्यारंभ आदेश दयावे **(नमुना प्रपत्र ६)** व प्रत लाभार्थ्यांस पाठवावी.

## ७. लाभार्थ्यांची जबाबदारी-

१) निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.

२) निश्चित केलेल्या आकारमानाचेच शेततळे घेणे बंधनकारक राहील.

३) काम २ महिन्यात पुर्ण करणे बंधनकारक राहील.

४) कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही.

५) शेततळयाच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक राहील.

उपसचिव

६) शेततळयाची निगा/दुरुस्तीची जबाबदारी शेतकऱ्यावर राहील.
७) पावसाळयामध्ये शेततळयात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था करावी लागेल.
८) शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे मग्रारोहयो अंतर्गत पुर्ण करण्यात आले याचा बोर्ड लाभार्थ्यांने लावणे बंधंनकारक आहे.

**८. आस्थापना खर्च**

शेततळयाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यास वित्तीय वर्षात जेवढे अनुदान वाटप होईल त्यांच्या ४ टक्के रक्कम आस्थापना विषयक बाबीसाठी देय राहील. त्यात जहिरात, लेखन सामुग्री , वेबसाईटवर माहिती भरणे , शेतक-यांना प्रशिक्षण देणे इ. बार्बीचा अंतर्भाव राहील. जिल्ह्याला लक्षांक मंजुर झाल्यावर अग्रीम स्वरुपात आस्थापना खर्चसाठी शासनाकडून रक्कम जिल्हाधिकारी यांना वितरित करण्यात येईल, व ती त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुपुर्द करावी. अग्रीम रक्कम अंतिमत: आस्थापना खर्चात समायोजित केली जाईल. सदर निधी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठित केलेल्या " आत्मा संस्थेच्या " स्वतंत्र खात्यात जमा करावा या संस्थेचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. झालेल्या खर्चाची माहिती वेबसाईटवर भरण्यात यावी. वित्तीय वर्ष संपल्यावर वर्षभरात झालेल्या खर्च, याबबात उपयोगिता प्रमाणपत्र, त्रयस्थ संस्थेचा अहवाल/ तपासणी अहवाल इ. सादर करुन पुढील वित्तीय वर्षात निधीची मागणी करावी.

**९. निधीची मागणी व खर्च-**

शेततळयाचे काम पुर्ण झाल्याचे लाभार्थ्यांने कळविल्यावर त्याची मोजमापे घेवून सक्षम अधिका-याची तपासणी झाल्यावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हाधिका-यांमार्फत शासनाकडे निधीची मागणी करावी. त्याप्रमाणे शासन निधी वितरीत करेल व देय निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करुन त्याप्रमाणे लाभार्थ्यांस कळवावे. निधीबाबत वेबसाईटवर माहिती भरण्यात यावी.

**१०. त्रयस्थ संस्थेमार्फत कामांची भौतिक तपासणी व मूल्यमापन-**

शेततळयाच्या कामाचे I.I.M. किंवा I.I.T. वा तत्सम संस्थेमार्फत काही प्रमाणात भौतिक तपासणी करुन घेण्यात यावी व योजनेचे मुल्यमापन सहकालिन (concurrent) पध्दतीने करुन घ्यावे. यावर शासन स्तरावर वेगळी कार्यवाही करण्यात येईल.

**११. संनियंत्रण अधिकारी व नोडल अधिकारी-**

मग्रारोहयो योजनेतंर्गत जाहीर केलेला शेततळे बांधण्याचा कार्यक्रम कालबध्दरीत्या पूर्ण करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. ही योजना राबविण्याकरिता आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **"संनियंत्रण अधिकारी"** म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्रासह सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या स्तरावरुन तातडीने निर्गमित कराव्यात.

मग्रारोहयो अंतर्गत शेततळयाची योजना धडक स्वरुपात राबविण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना " **नोडल अधिकारी** " म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या योजनेची अंमलबजावणी

उपसचिव

काटेकोरपणे व विहित मुदतीत करावी व शेततळयांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा अहवाल नियमितरित्या वेबसाईटवर भरावा.

जिल्हा/ तालुक्यांना दिलेले उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करणे. पूर्ण झालेल्या शेततळयाची तपासणी करुन अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर अदा करणे, इत्यादीसाठी संबंधित विभागीय कृषि सहसंचालक हे जबाबदार राहतील.

**१२.** **मग्रारोहयो व रा.कृ.वि. योजने अंतर्गत शेततळयासाठी एकत्रित कार्यवाही-**

मग्रारोहयो अंतर्गत शेततळयाची योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांना ( मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) लागू आहे. तर राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत शेततळयाची योजना सध्या २५ जिल्ह्यांना लागू आहे. ज्या जिल्ह्यांना या दोन्ही योजनांचा लक्षांक दिला जाईल. त्या जिल्ह्यांनी खालील प्रकिया एकत्रितरित्या पूर्ण करावी.:-

१) जाहिरात देणे.
२) अर्ज मागविणे.
३) अर्जाची छाननी.
४) लाभार्थी निवड समितीची मान्यता.
५) प्रशिक्षण कार्यक्रम.

दोन्ही योजना अंतर्गत अर्ज एकच असल्याने लाभार्थ्यांची पात्रता निश्चित झाल्यावर त्याला लाभ कोणत्या योजनेतून द्यावयाचा याचा निर्णय निवड समिती घेईल.

**१३.** **वेबसाईटवर-**

लाभार्थी निवडीची प्रकिया पारदर्शक असावी म्हणून या योजनेसाठी स्वतंत्र **http://mahaegs.nic.in/maha_shettale/** ही वेबसाईट NIC च्या मदतीने तयार करण्यात आली आहे. या वेबसाईटवर इच्छुक लाभार्थ्यांचे नाव, त्याने कोणत्या दिनाकांस अर्ज केला, त्याची वैयक्तीक माहिती, लाभार्थी निवड समितीने निवडलेले लाभार्थी, जिल्हाधिका-याने दिलेली प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, काम पुर्ण केल्याचा दिनांक, निधी वितरित केल्याची माहिती इत्यादी टाकण्यात यावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत वेबसाईट वर आज्ञावलीत माहिती भरण्याबाबतच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आल्या आहेत.

१४. सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१०००१०११७५६४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुनील पोरवाल)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

C:\Documents and Settings\Admin\Desktop 18 RKVY. 27.10.2009

उपसचिव

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,
सर्व उपायुक्त (विकास),
महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
विषेश कार्यकारी अधिकारी (मग्रारोहयो)/सर्व सहसचिव/ सर्व उपसचिव/ सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (जलसंधारण उपविभाग) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय.
निवडनस्ती रोहयो-५

C:\Documents and Settings\Admin\Desktop 18 RKVY. 27.10.2009

उपसचिव

## प्रपत्र-१

### राष्ट्रीय कृषी विकास योजना/ महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना अंतर्गत शेततळी घेण्याबाबत

**जाहिरात क्रमांक:-** **दिनांक:-**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा | |
| २ | योजनेचे नाव | राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) / महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना (MREGS) |
| ३ | उद्दिष्ट | ----------------- + ---------------- एकूण |
| ४ | पात्रता | **i)** ज्या शेतक-यांकडे त्यांच्या नांवावर कमीत कमी ०.६० हे. जमिन उपलब्ध आहे.<br>**ii)** ज्या शेतक-यांना यापूर्वी इतर योजनांच्या माध्यमातून विहिर किंवा इतर सिंचन सुविधा मंजूर केली नाही.<br>**iii)** लाभार्थी शेतक-याची जमिन शेततळयाकरिता तांत्रिकदृष्टया पात्र असणे आवश्यक. |
| ५ | आवश्यक कागदपत्र | **i)** जमीनीची ७/१२<br>**ii)** ८ अ चा उतारा<br>**iii)** जातीचा दाखला (SC/ ST साठी)<br>**iv)** जॉब कार्ड (MREGS साठी) |
| ६ | प्राधान्यक्रम | **i)** अनुसूचित जाती-जमाती शेतकरी.<br>**ii)** दारिद्रय रेषेखालील (BPL) शेतक-यांमधील सर्वांत शेवटच्या शेतक-याची निवड प्रथम या पध्दतीनी (अंत्योदय मोड)<br>**iii)** अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी.<br>**iv)** वरील प्रवर्गातील पुरेसे शेतकरी उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील सर्व शेतकरी.<br>**Vi)** महिला अर्जदारास प्राधान्य राहिल. |
| ७ | शेततळयाचे आकारमान व अनुदान | (see table below) |
| ८ | अर्ज मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण, दुरध्वनी क्रमांक | तालुका कृषी अधिकारी |
| ९ | अर्ज दोन प्रतीत सादर करण्याचा अंतिम दिनांक | |

| अ.क्र. | शेततळयाचे आकारमान (मीटरमध्ये) | अनुज्ञेय अनुदान (रुपये) |
|---|---|---|
| **१** | १५ x १५ x ३ | १६५१५ |
| **२** | २० x १५ x ३ | २३२६० |
| **३** | २० x २० x ३ | ३२८१० |
| **४** | २५ x २० x ३ | ४२३६० |
| **५** | २५ x २५ x ३ | ५४७१५ |
| **६** | ३० x २५ x ३ | ६७०७५ |
| **७** | ३० x ३० x ३ | ८२२४० |

## प्रपत्र-२

**राष्ट्रीय कृषि विकास योजना / मग्रारोहयो अंतर्गत शेततळे घेण्याकरिता अर्जाचा नमुना**

**प्रति,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
**------------------.**

**विषय :- राष्ट्रीय कृषि विकास योजना / महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत शेततळे मिळण्याबाबत.**

**महोदय,**

मी खालील सही करणार विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मला राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेततळे घ्यावयाचे आहे. माझी वैयक्तीक व शेती संबंधातील माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | (प्रथम नाव) / (वडिलाचें/ पतिचे नाव) / (आडनाव) |
| २ | स्त्री / पुरुष | स्त्री / पुरुष |
| ३ | गाव | |
| ४ | तालुका | |
| ५ | जिल्हा | |
| ६ | दुरध्वनी क्रमांक | |
| ७ | जात/ संवर्ग | SC / ST / Other — संवर्ग; जात |
| ८ | असल्यास, दारिद्रय रेषे खालील यादीतील अनुक्रमांक | |
| ९ | म.ग्रा.रो.ह.यो. शी संबंधित जॉब कार्ड नंबर | |
| १० | शेततळे घ्यावयाचा शेताचा सर्व्हे/ गट क्र. व क्षेत्र | सर्व्हे नंबर / धारण क्षेत्र (हेक्टर) |
| ११ | वरील सर्व्हे / गट क्र. व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शेती धारण केली आहे काय ? | |
| १२ | स्वत: अथवा कुटुंबातील अन्य सदस्याने यापूर्वी शासकीय योजनेतून शेततळे / विहिर /बोअरवेल /इतर सिंचन सूविधा योजनेचा लाभ घेतला आहे काय ? | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| १३ | अथवा शेतामध्ये विहीर / बोअरवेल / इतर सिंचन सुविधा खाजगीरित्या उपलब्ध केली आहे काय? | होय / नाही |
| १४ | शेततळयाचा वापर कशासाठी करणार. (नियमित धान्य उत्पादन / फलोत्पादन /वृक्ष लागवड/ मत्स्य व्यवसाय इत्यादी.) | |
| १५ | शेततळे करिता प्रशिक्षणाची गरज आहे काय ? | होय / नाही |
| १६ | मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान (मिटर) | |

१७ बँक खाते

| बॅकेचे नांव | शाखा | बँकेचा कोड क्र. | खाते क्र. |
|---|---|---|---|
| | | | |

१८ अर्जा सोबत जोडलेली कागदपत्रे

| | |
|---|---|
| ७/१२ उतारा व ८-अ नमुना | होय/ नाही |
| जातीचा दाखला | होय/ लागू नाही |
| दारिद्रे रेषेबाबतचा दाखला | होय/ लागू नाही |
| जॉब कार्ड | होय/ लागू नाही |
| इतर | |

शेततळे योजनेची सर्व माहिती मला मिळाली असून, योजनेचे नियम व अटी मला मान्य आहेत. शेततळे योजनेचा लाभ मिळणेस विनंती आहे.

मी असे प्रमाणित करतो की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व बरोबर आहे. वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास निवड होण्यात मी अपात्र राहीन.

**आपला विश्वासू**

**दिनांक -**

**( )**

**फक्त कार्यालयीन वापरासाठी**

**आवक क्र:-**
**अर्ज मिळाल्याचा दिनांक :-**
**अर्ज स्विकारणा-या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव, पदनाम व सही (दिनाकांसह)**
**पोच मिळाल्याबाबत**
**लाभार्थ्यांची सही/अंगठा**

# प्रपत्र-३

**अर्जदाराच्या अर्जाची/ मागणीपत्राची छाननी अहवालाचा नमुना**

**अर्ज प्राप्त दिनांक** **आवक नोंद/ क्रमांक-**

**अ) अर्ज छाननी**

१ अर्जदाराचे नांव

| (प्रथम नाव) | (वडिलाचें/ पतिचे नाव) | (आडनाव) |
|---|---|---|

२ गाव

३ तालुका

४ जिल्हा

५ जात/ संवर्ग

| जात | संवर्ग |
|---|---|

६ असल्यास, दारिद्रय रेषे खालील यादीतील अनुक्रमांक

७ म.ग्रा.रो.ह.यो. शी संबंधित जॉब कार्ड नंबर

८ एकूण जमिन धारणा (हेक्टर) व वर्गवारी

| हेक्टर | वर्गवारी |
|---|---|

९ शेततळे घ्यावयाचा शेताचा सर्व्हे/ गट क्र. व क्षेत्र

| सर्व्हे नंबर | धारण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|

१० मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान (मिटर)

११ अर्जा सोबत प्राप्त कागदपत्रे

| | |
|---|---|
| ७/१२ उतारा व ८-अ नमुना | होय/ नाही |
| जातीचा दाखला | होय/ लागू नाही |
| दारिद्रे रेषेबाबतचा दाखला | होय/ लागू नाही |
| जॉब कार्ड | होय/ लागू नाही |
| इतर | |

१२ योजनेच्या निकषाप्रमाणे व धारण केलेल्या शेती क्षेत्रानुसार अर्जदाराची वर्गवारी

अल्प/ अत्यल्प/ भूधारक/ इतर

१३ मागणी अर्जातील माहितीत विसंगती /तांत्रिक चूक आढळली काय ?

१४ असल्यास, दुरुस्ती नंतर मागणी अर्ज पात्र /अपात्र

शेतक-याचा अर्ज व उपलब्ध कागदपत्रानुसार अर्जदार शेतकरी शेततळे योजनेच्या लाभासाठी पात्र आहे. तत्पूर्वी जागा पहाणी होण्यास शिफारस आहे.

( )
मंडळ कृषी अधिकारी

## ब) जागा पहाणी -

**दिनांक -**
**जागा पहाणी करणा-या अधिका-याचे नांव श्री. ------------------------------कृषि सहाय्यक----------------**

| | | |
|---|---|---|
| १ | विनंती अर्जानुसार मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान (मिटर) | |
| २ | तपासणीच्या वेळी शेतक-याने स्वतः अथवा कुटुबांतील अन्य सदस्यांना यापूर्वी शासकीय योजनेतून शेततळे / विहिर /बोअरवेल / इतर सिंचन सूविधा योजनेचा लाभ घेतल्याचे आढळले काय ? | |
| ३ | अथवा, शेतामध्ये विहीर/बोअरवेल/इतर सिंचन सुविधा खाजगी रित्या उपलब्ध केली आहे काय? | |
| ४ | शेततळयासाठी जागा तांत्रिक दृष्टया योग्य आहे काय ? | |
| ५ | अर्जातील मागणी केलेल्या आकारमानाचे शेततळे उपलब्ध जागा व तांत्रिक मापदंडानुसार घेता येईल काय ? | |
| ६ | सदर शेततळे समुह पध्दतीतील (cluster Approch ) आहे काय ? | |
| ७ | शेततळे कार्यक्रम अंमलबजावणीत येऊ शकणा-या अडचणी व उपाय | अडचणी - / उपाय - |

जागा पहाणीत शेतक-यांने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यातील माहिती बरोबर असून शेतकरी शेततळे घेण्यास इच्छुक असल्याचे आढळले तसेच शेतक-याने विनंती अर्जात दर्शविलेली व क्षेत्र पहाणीत तपासणी केलेली जागा शेततळयास योग्य आहे.

**सही/-**

**(नाव- )**
**कृषी सहाय्यक----------------**

**दिनांक :-**

शेतक-याचा अर्ज, सादर केलेली कागदपत्रे, माहिती नुसार त्याची पात्रता व कृषि सहाय्यक्ने प्रत्यक्ष जागा पहाणीत नमुद केलेले निष्कर्श पाहता शेतक-यास शेततळे योजनेचा लाभ देण्यास शिफारस करण्यात येत आहे/येत नाही.

दिनांक :-                                        कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषी अधिकारी,------------------

## प्रपत्र-४

**मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे रा.कृ.वि.यो./मग्रारोहयो अंतर्गत शेततळे मंजुरीसाठी सादर करावयाच्या यादीचा नमुना**

**अ) प्राप्त अर्जांचा तालुका निहाय गोषवारा**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | प्राप्त अर्जांची एकूण संख्या | अर्जांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रय रेषे खालील | अल्प/अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग |
| | | | स्त्री | | | | | |
| | | | पुरुष | | | | | |
| | | | एकूण | | | | | |

**ब) पात्र अर्जांचा तालुका निहाय गोषवारा**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | प्राप्त अर्जापैकी पात्र अर्जांची संख्या | पात्र अर्जांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रय रेषे खालील | अल्प/अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग |
| | | | स्त्री | | | | | |
| | | | पुरुष | | | | | |
| | | | एकूण | | | | | |

**टिप - उपरोक्त गोषवा-या सोबत अर्जदार लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी (पात्र व अपात्र सह) जोडली आहे.**

(                    )

दिनांक -                                        जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-

------------------------------------------------------------------------------------------------

**क) सर्व अर्जदार लाभार्थ्यांची तालुकानिहाय आवक सुचीनुसार यादी**

**राष्ट्रीय कृषि विकास योजना**

| अ क्र | तालुका | शेतक-यांचे नाव | पत्ता | शेतक-यांची वर्गवारी | | | | | प्रस्तावित शेततळयांचा आकार | शेततळे घ्यावयाचा सर्व्हेक्र. | पात्र / अपात्र | अपात्र असल्यास कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रय रेषे खालील | अल्प अत्यल्प भुधारक | इतर प्रवर्ग | | | | |

(                    )

दिनांक -                                        जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-

## प्रपत्र - ५

राष्ट्रीय कृषि विकास योजना / मग्रारोहयो अंतर्गत शेततळे करिता प्राप्त अर्जदारांच्या अर्जाची छाननी व शिफारशीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी, --------------------------यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक -------------- रोजीच्या बैठकीत जिल्हा निवड समितीने शासन निर्णयातील निकष, मार्गदर्शक सूचना व दिलेल्या उद्दिष्टांच्या अधिन राहून वरीलप्रमाणे तालुकानिहाय पात्र लाभार्थ्यांपैंकी खालील प्रमाणे लाभार्थी निवडीस मान्यता दिली आहे.

### अ) निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रय रेषे खालील | अल्प/अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग |
| | | | स्त्री | | | | | |
| | | | पुरुष | | | | | |
| | | | एकूण | | | | | |

( )
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-----------------**

( )
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हा---------------------**

### ब) निवडलेले लाभार्थ्यांची यादी

| अ.क्र. | तालुका | शेतक-यांचे नाव व पत्ता | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रयरेषे खालील | अल्प / अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग | क्षेत्र | योजना |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

( )
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-----------------**

( )
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हा---------------------**

### क) प्रतिक्षा यादी

| प्रतिक्षा. क्र. | तालुका | शेतक-यांचे नाव व पत्ता | निवडलेल्या लाभााार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रयरेषे खालील | अल्प / अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग | क्षेत्र | योजना |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

( )
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-----------------**

( )
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हा---------------------**

## ड) अपात्र अर्जदारांची यादी

| अ.क्र. | तालुका | शेतक-यांचे नाव व पत्ता | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु जाती | अनु जमाती | दारिद्रियरेषे खालील | अल्प / अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग | क्षेत्र | योजना |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**( )**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी----------------**

**( )**
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हा--------------------**

## प्रपत्र-६

### राष्ट्रीय कृषि विकास योजना / मग्रारोहयो अंतर्गत शेतकरी /लाभार्थ्यास द्यावयाच्या कार्यारंभ /मंजुरी आदेश

जाक्र/शेततळे/राकृवियो/-------------/०९
कार्यालय
तालुका कृषि अधिकारी------------------------
दिनांक -----/----/०९

प्रति,

श्री.----------------------------

मु.पो.--------------------------

ता.---------------, जि.-------------

विषय :- मग्रारोहयो योजनेंतर्गत शेततळे मंजूरी/ कार्यारंभ आदेशबाबत......

उपरोक्त विषयावर आपल्या दिनांक ----------च्या मागणीपत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि.--------रोजी झालेल्या जिल्हा निवड समितीच्या बैठकीत आपली शेततळे करिता लाभार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. पुढील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आपणांस -- x -- x -- इतक्या आकारमानाचे शेततळे कार्यारंभ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपण शेततळयाचे काम सुरु करावे.

१) निश्‍चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.
२) निश्‍चित केलेल्या आकारमानाचेच शेततळे घेणे बंधनकारक राहील.
३) काम दोन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.
४) काम पूर्ण झाल्यावरच अनुदानाची मागणी करता येईल.
५) कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही.
६) मजूर/मशिनच्या मालकास शासनाकडून परस्पर पेमेंट केले जाणार नाही.
७) शेततळयाच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक राहील.
८) शेततळयाची निगा/दुरुस्तीची जबाबदारी शेतक-यावर राहील.

९)पावसाळयामध्ये शेततळयात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था करावी लागेल.

१०) शेततळयातून पिकांना पाणी देण्याची व्यवस्था शेतकऱ्यास स्वखर्चाने करावी लागेल.

११) कृषि सहाय्यक यांनी साईट सिलेक्शन आखणी करुन दिल्यावरच व मंजूर अंदाजपत्रकासोबतच्या गट नं. मध्ये काम करावे. आपले मर्जीने कामे सुरु केल्यास शेततळयाचे अनुदान काढण्याची जबाबदारी घेण्यात येणार नाही.

१२) दुस-याच्या शेतापासून दहा फुटाचे अंतरावर स्वत:च्या शेतात काम करावे.

१३) मंजूर शेततळे ज्या योजनेतून पुर्ण करण्यात आले आहे. त्यांचा बोर्ड लावणे.

१४) दोन महिन्यात काम सुरु न झाल्यास हे आदेश रद्द ठरतील व प्रतिक्षायादीवरील अन्य लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

तालुका कृषी अधिकारी -------------------------------

प्रत, माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी ----------------------------

२) उपविभागीय कृषी अधिकारी -------------------------------

## अ) <u>प्रतिक्षा यादीतील अर्जदारास प्रतिक्षासूची क्रमांक कळविणेबाबत.</u>

जाक्र/शेततळे/राकृवियो/-------------/०९
कार्यालय
तालुका कृषि अधिकारी-------------------------
दिनांक -----/----/०९

प्रति,

श्री.----------------------------

मु.पो.--------------------------

ता.---------------, जि.-------------

विषय :- मग्रारोहयो योजनेंतर्गत शेततळे मंजूरी/ कार्यारंभ आदेशबाबत......

उपरोक्त विषयावरील आपल्या दिनांक ----------च्या मागणीपत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि.--------रोजी झालेल्या जिल्हा निवड समितीच्या बैठकीत शेततळे करिता आपला अर्ज पात्र ठरविण्यात आला. असून आपले नाव प्रतिक्षा सूचीत अनुक्रमांक --------------वर समाविशष्ट करण्यात आले आहे.

**तालुका कृषी अधिकारी** -------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------

## ब) <u>अपात्र ठरलेलया अर्जदारास कळविणेबाबत.</u>

जाक्र/शेततळे/राकृवियो/-------------/०९
कार्यालय
तालुका कृषि अधिकारी-------------------------
दिनांक -----/----/०९

प्रति,

श्री.----------------------------

मु.पो.--------------------------

ता.---------------, जि.-------------

विषय :- मग्रारोहयो योजनेंतर्गत शेततळे मंजूरी/ कार्यारंभ आदेशबाबत......

उपरोक्त विषयावरील आपल्या दिनांक ----------च्या मागणीपत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि.--------रोजी झालेल्या जिल्हा निवड समितीच्या बैठकीत शेततळे करिता आपला अर्ज खालील कारणास्तव अपात्र ठरविण्यात आला आहे.

१----------------------
२---------------------
3---------------------

**तालुका कृषी अधिकारी** ------------------------------

## प्रपत्र-७

**मंजूर शेतळेचे काम पूर्ण झाल्याबाबत लाभार्थी/ शेतक-याने द्यावयाचा काम पूर्णत्वाचा अहवाल नमुना**

मी, श्री./ श्रीमती ---------------------- गांव ------------- तालुका------------ जिल्हा------------- असे प्रमाणित करतो /करते की, तालुका कृषी अधिकारी---------------यांच्या आदेश क्र----------दि. ------- अन्वये मला मूंजर केलेल्या - X - X - या आकारामानाच्या शेततळयाचे काम दि.----------- पर्यंत पूर्ण केले आहे.

कृपया, शेततळयाच्या कामाचे मोजमाप करुन मला अनुज्ञेय ठरणारे अनुदान अदा करण्यात यावे, ही विंनती.

**दिनांक -** **अर्जदाराची सही/अंगठा**

# प्रपत्र-८

## काम पूर्ण झालेल्या शेततळयाची तपासणी व मोजमाप अहवाल

**योजना :- मग्रारोहयोजना** **तपासणीचा दिनांक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थ्यांचे नांव | (प्रथम नाव) | (वडिलाचें/ पतिचे नाव) | (आडनाव) |
| २ | गाव | | | |
| ३ | तालुका | | | |
| ४ | जिल्हा | | | |
| ५ | जात/ संवर्ग | जात | संवर्ग | |
| ६ | असल्यास, दारिद्रय रेषे खालील यादीतील अनुक्रमांक | | | |
| ७ | मंजूरी तपशिल | | | |
| | i) जिल्हास्तरीय समितीचा मान्यता दिनांक | | | |
| | ii) सविस्तर अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता दिनांक | | | |
| | iii) कार्यारंभ आदेश | | | |
| ८ | शेततळे घेतलेल्या शेताचा सर्व्हे/ गट क्र. | | | |
| ९ | मंजूर शेततळयाचे आकारमान (मिटर) | | | |
| १० | तपासणीमध्ये आढळलेले शेततळयाचे आकारमान (मिटर) | | | |
| | i)लांबी | | | |
| | ii)रुंदी | | | |
| | iii)खोली | | | |
| | iv)क्षेत्रफळ | | | |
| ११ | सविस्तर अंदाज पत्रकानुसार शेततळयामध्ये आढळलेल्या उणिवा | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | मंजूर आकारमानानुसार अनुदानाची रक्कम | | | |
| १३ | तपासणीनुसार शेततळयास देय होणारी रक्कम | | | |
| १४ | लाभार्थ्यांचे बँक खाते | बॅंकेचे नांव | शाखा | खाते क्र. |
| १५ | शेततळयाचा फोटो/ व्हीडीओ | फोटो सोबत जोडावा | | |

तपासणीमध्ये उपरोक्त प्रमाणे नोंदी आढळल्या असून केलेल्या कामानुसार शेततळयाचे आकारमान----------असे आहे व रु.------------अनुदान अदा व्हावे. सोबत मोजमाप पुस्तिकेची प्रत/झेरॉक्स प्रत जोडली आहे.

**सही/-**
**(नाव- )**
**कृषी सहाय्यक ----------------**

---

**उपरोक्त प्रमाणे तपासणी माझ्या समक्ष केली असून घेतलेल्या नोंदी व देय अनुदान मला मान्य आहेत.**

**सही/-**
**(नाव- )**
**दिनांक :-** **लाभार्थी --------------------**

---

शेततळे कामाच्या उपरोक्त तपासणी अहवालानुसार शेतक-यास-----------------आकारमानाप्रमाणे रु.----------अनुदान देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**दिनांक :-** **कृषी पर्यवेक्षक-----------------**

**मंडळ कृषी अधिकारी-------------**
**तालुका कृषी अधिकारी,-----------------**

# प्रपत्र-९

**शेततळे योजनेअंतर्गत शेततळयासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणचा तपशिल**

शेततळयाचे महत्व, उपयोग व फायदे याची माहिती देण्याकरीता व शेततळयाची निगा राखण्याकरिता लाभार्थ्यांस प्रत्यक्ष कामापूर्वी व काम पूर्ण झाल्यावर दिलेल्या प्रशिक्षणाची माहिती.

| अ.क्र. | प्रत्यक्ष कामापूर्वी प्रशिक्षण | | काम संपल्यांनंतर प्रशिक्षण | |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणाचे तारीख - | | | |
| | | | | |
| २ | प्रशिक्षणाचे ठिकाण - | | | |
| ३ | एकूण निवड झालेल्या लाभार्थ्यांची संख्या- | | | |
| ४ | प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी उपस्थित लाभार्थ्यांची संख्या- | | | |
| ५ | प्रशिक्षण शिबिरात लाभार्थ्यांना मागदर्शन देणा-या अधिकारी / तज्ञ व्याख्यातांची नावे | | | |

| अ.क्र. | काम पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १ | प्रशिक्षणाचे तारीख - | | | |
| | | | | |
| २ | प्रशिक्षणाचे ठिकाण - | | | |
| | | | | |
| ३ | एकूण निवड झालेल्या लाभार्थ्यांची संख्या- | | | |
| | | | | |
| ४ | प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी उपस्थित लाभार्थ्यांची संख्या- | | | |
| | | | | |
| ५ | प्रशिक्षण शिबिरात लाभार्थ्यांना मागदर्शन देणा-या अधिकारी / तज्ञ व्याख्यातांची नावे | | | |

# प्रपत्र-१०

**शेततळयांच्या वापरानंतर किमान दोन वर्षांनी करावयाच्या निरिक्षण अहवालाचा नमुना**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थ्यांचे नाव | | | |
| ३ | पत्ता | | | |
| ४ | शेततळयाचे आकारमान | | | |
| ४ | शेततळे कोणत्या वर्षी पूर्ण केले होते | | | |
| ५ | वापरानंतर निरिक्षणाच्या वेळी शेततळयाची स्थिती कशी आहे | | | |
| ६ | शेततळयामुळे पाण्याची पातळी वाढली का ? | | | |
| ७ | शेततळयामुळे किती क्षेत्र ओलीताखाली आले | | | |
| ८ | शेततळयांत पावसाच्या पाण्यामुळे गाळ साचले का ? | | | |
| ९ | शेततळयांतील साठलेले पाणी पाझरते का ? | | | |
| १० | शेततळयाची निगा लाभार्थ्यांने वेवस्थित ठेवली आहे का ? | | | |
| ११ | लाभार्थ्यांनी शेततळयाच्या पाण्यावर कोणकोणती पीके घेतली व उत्पन्नात पूर्वी पेक्षा काय फरक पडला | | | |
| १२ | शेततळयाचा वापर शेतातील पिकांव्यतिरिक्त अन्य पूरक व्यवसाय /कामांसाठी केला काय ? | | | |
| १३ | इतर | | | |

( )

निरिक्षणाचा दिनांक - निरिक्षण करणारा अधिकारी/ कर्मचारी

# परिशिष्ट "अ"

| अनु.क्र. | कार्यवाहीची बाब | कार्यवाही | संगणकामार्फत करावयाची कार्यवाही | संगणकात भरावयाची माहिती | कोणत्या स्तरावर माहिती करावी | पुर्वतयारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शा.नि.निर्गमित | जिल्हयांना कळविणे | निरंक | जिल्हा / तालुका निहाय लक्षांक वाटप करणे | राज्य | निरंक |
| २ | शा.नि.प्राप्त | जाहिरात देणे | जिल्हा लक्षांक | जाहिरात दिनांक व तालुका निहाय लक्षांक वाटप करणे | जिल्हा | शासनाकडून लक्षांक निश्चित करणे |
| ३ | प्राप्त अर्ज | आवक क्रमांक देणे पोच देणे | निरंक | अर्जाचा तपशिल नोंदविणे / यादी | तालुका | जिल्हास्तरावर जाहिरात |
| ४ | अर्ज मागे घेणे | अर्जाच्या यादीतून नाव कमी करणे | निरंक | अर्ज मागे घेतल्याची नोंद करणे | तालुका | अर्जाचा तपशिल नोंदविणे |
| ५ | अर्जाची अंतिम यादी | तपासणी ('अ'आणि 'ब') करिता पाठविणे | तपासणी सूची | तपासणीचे दिनांक | तालुका | अर्जाचा तपशिल नोंदविणे |
| ६ | जाहिरात दिल्यापासून २० दिवसाचे आत | सर्व अर्जाची छाननी व तपासणी | अर्जाची यादी व तपशिलसह | निरंक | जिल्हा | जिल्हा स्तरावर जाहिरात |
| ७ | बैठकीचे आयोजन | अर्जाची यादी तपशिलासह | अर्जदारांची तपशिलवार यादी व वैध / अवैध अर्जदार | बैठकीचा दिनांक | जिल्हा | जिल्हा स्तरावर जाहिरात |
| ८ | बैठक संपन्न | पात्र,अपात्र व प्रतिक्षाधीन अर्जदारांची यादी तयार करणे | निरंक | बैठकीचा दिनांक | जिल्हा | बैठकीचे आयोजन |
| ९ | तांत्रिक मान्यतेसाठी अर्ज पाठविणे | तांत्रिक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. प्रतिक्षाधीन व अपात्र अर्जदारांना पत्र पाठविणे | तांत्रिक मंजूरीसाठी पाठवायच्या अर्जाचा तक्ता, अपात्र व प्रतिक्षाधीन अर्जदारांना पाठवावयाची पत्रे | पात्र, अपात्र व प्रतिक्षाधीन अर्जदारांची यादी | तालुका | बैठक संपन्न |

उपसचिव

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | कार्यवाही | संगणकामार्फत वेबसाईटवर करावयाची कार्यवाही | संगणकात भरावयाची माहिती | कोणत्या स्तरावर माहिती करावी | पुर्वतयारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | अपात्र व प्रतिक्षाधीन अर्जदार | पत्र पाठवून कळविणे | पत्र तयार करणे | निरंक | तालुका | अर्जाचा तपशिल नोंदविणे |
| ११ | तांत्रिक मंजूरी प्राप्त | मंजूरीचे पत्र देणे | मंजूरीचे पत्र तयार करणे | तांत्रिक मंजूरीची नोंद घेणे | तालुका | अर्ज प्राप्त, बैठक संपन्न |
| १२ | मंजूरीचे आदेश देणे | कामाचे पूर्व प्रशिक्षण देणे | निरंक | प्रशिक्षणाचा तपशिल | तालुका | मंजूरीचे पत्र देणे |
| १३ | काम पूर्ण झाल्याचे पत्र | तपासणी व मोजमाप घेणे | तपासणी तक्ता व मोजमाप नोंदी | पुर्ण केलेल्या कामाचा तपशिल नोंदविणे | तालुका | मंजूरीचे पत्र देणे |
| १४ | काम पूर्ण झाल्याचे पत्र | काम पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण | निरंक | प्रशिक्षणाचा तपशिल | तालुका | काम पूर्ण झाल्याचे पत्र |
| १५ | मंजूरी आदेश दिल्यानंतर दोन महिने | काम अपूर्ण असल्यास तपासणी करुन मंजूरी रद्द केल्याबाबत कळविणे | मंजूर पण अपूर्ण कामाची नोंद घेणे. रद्द केल्याचे पत्र तयार करणे | रद्द केल्याबाबतचा सर्व तपशिल नोदविणे | तालुका | मंजूरीचे पत्र देणे |
| १६ | क्षेत्रफळ, मोजमापे, ठिकाण यामध्ये बदल करणे | सुधारित प्रस्ताव | निरंक | निरंक | तालुका | अर्जाचा तपशिल नोंदविणे मंजूरीचे पत्र देणे |
| १७ | पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप व तपासणी अहवाल प्राप्त | अनुदान प्रदानाची कार्यवाही | निरंक | अनुदान प्रदानाचा तपशिल | जिल्हा | मोजमाप व तपासणी अहवाल |
| १८ | अनुदान वितरणाची तयारी | अनुदान प्रदान करणे | निरंक | अनुदान प्रदानाचा तपशिल | जिल्हा | मोजमाप व तपासणी अहवाल |
| १९ | २ वर्षानंतर तपासणी | तपासणी करणे | २ वर्षानंतर तपासणीसाठी तपशिलवार तक्ता तयार करणे | तपासणीचा सर्व तपशिल नोंदविणे | तालुका | २ वर्षापूर्वी काम पूर्ण |

उपसचिव

## "परिशिष्ट अ"

| Event | Action | Generate from Computer | Enter in Computer | Who will login | Pre-requisite |
|---|---|---|---|---|---|
| G.R.Issued | Inform districts | Nil | Targets for District/ Talukas | State | Nil |
| G.R.Issued | Advertise | District Target | Advertisement date/Talukawise target | District | Targets entered by State |
| Application received | Give inward No. and acknowledge | Nil | Application data | Taluka | Advertised for District |
| Application withdrawn | Delection from the list | Nil | Note taken in Application data | Taluka | Application data entered |
| Application Final list | Send for scrutiny(A,B) | Scrutiny sheet | Scrutiny A & B date | Taluka | Application data entered |
| 20 days from advertisement | Check all received applications are scrutinised. | Summary and application list | Nil | District | Advertised for District |
| Meeting scheduled | Prepare summary and list of applicants | Summary and ordered list of valid and invalid applications | Meeting date | District | Advertised for District. |
| Meeting held | List out selected, wait listed and invalid applications | Nil | Meeting held date | District | Meeting scheduled |
| Sending for technical sanction | Prepared for technical sanction, give letter for wait listed and rejected | Technical Sanction list, Wait list letter Rejection letter | Enter selected, wait listed and rejected applications | Taluka | Meeting held and applicant has applied |
| Rejection/Waiting | Issue letter to rejection and waiting | Rejection/Waiting letter | Nil | Taluka | Application Data Entered |
| Technical sanction received | Give sanction letter | Selection letter | Enter Technical sanction | Tal;uka | Meeting held, applicant has applied. Technical sanction received |
| Sanction letter given | Call for pre work training | Nil | Enter training details | Taluka | Sanction letter given |
| Work completion letter | Make measurement and inspection | Measurment and inspection sheet | Work completion details | Taluka | Sanctioned |
| Work completion letter | Call for post work training | Nil | Enter training details | Taluka | Work complition letter received |
| 2 months from sanction letter given | Monitor incomplete works. Give cancellation letter | Generate sanctioned bu not completed works. Generate cancellation letter | Enter cancellation details | Taluka | Sanctioned |
| Change in Area/ Measuremnt/Survey No./Location | Revised Proposal | Nil | Nil | Taluka | Measurement and Inspection Report entered |
| Measurement and Inspection Report received | Prepare payment | Nil | Payment details | Distric | Measurement and Inspection Report entered |
| Payment ready | Give payment | Nil; | Payment details | District | Measurement and Inspection Report entered |
| 2 year Inspection | Make Inspection | Generate 2 year Inspection sheet | Enter Inspection details | Taluka | Work is completed ,2 years ago |

उपसचिव